**विशेष आयात परवान्यासह आयात परवाना, शुल्क मुक्त आगाऊ परवाना आणि विदेश व्यापार धोरणान्वये विदेश व्यापार (विकास आणि विनियमन) अधिनियम, १९९२ खाली निर्गमित केली जाणारी इतर कोणतीही स्क्रिप्स् यांवर १/४/२००५ ते ३१/१२/२०१० पर्यंतच्या कालावधीसाठी भरलेला कर व त्यावरील वजावट यासंबंधी प्रशासकीय सवलत देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**वित्त विभाग,**

**शासन निर्णय क्रमांक- मुवक १५११/ प्र.क्र. १११/ कराधान-१**

**मंत्रालय, मुंबई ४०००३२.**

**दिनांक :- २१ ऑक्टोबर, २०११.**

**प्रस्तावना -**

राज्यात मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२ ची अंमलबजावणी दिनांक १/४/२००५ पासून करण्यात आली आहे. मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२ च्या अनुसूची ग - नोंद क्र. ३९ च्या नोंद ३ मध्ये दिनांक १/४/००५ ते ३१/१२/२०१० या कालावधीत विदेश व्यापार धोरणाखाली निर्गमित काही स्क्रिप्स् (scrips) अधिसूचित करण्यात आल्या होत्या. या व्यतिरिक्तच्या स्क्रिप्स् (scrips) मूल्यवर्धित कर अधिनियमाच्या अनुसूची क - नोंद क्र. २७ अनुसार करमुक्त होत्या.

वित्त विभाग, अधिसूचना क्रमांक - मुवक १५१०/ प्र.क्र.१०९/ कराधान-१, दिनांक २०/१२/२०१० अन्वये दिनांक १/१/२०११ पासून अनुसूची ग - नोंद क्र. ३९ च्या नोंद ३ मध्ये बदल करुन **विशेष आयात परवान्यासह आयात परवाना, शुल्क मुक्त आगाऊ परवाना** आणि विदेश व्यापार धोरणान्वये विदेश व्यापार (विकास आणि विनियमन) अधिनियम, १९९२ खाली निर्गमित केली जाणारी इतर कोणतीही स्क्रिप्स् समाविष्ट होतील अशी सर्व समावेशक नोंद करण्यात आली आहे.

दिनांक १/१/२०११ पूर्वीच्या कालावधीमध्ये काही व्यापा-यांनी अनुसूची ग - नोंद क्र.३९ च्या नोंद ३ मध्ये विशेष आयात परवान्यासह आयात परवाना, शुल्क मुक्त आगाऊ परवाना आणि विदेश व्यापार धोरणान्वये विदेश व्यापार (विकास आणि विनियमन) अधिनियम, १९९२ खाली निर्गमित केली जाणारी इतर कोणतीही स्क्रिप्स् समाविष्ट आहेत असा समज करुन त्यांच्या विक्रीवर दिनांक १/४/२००५ ते दिनांक ३१/३/२०१० या कालावधीत ४ टक्के दराने व दिनांक १/४/२०१० ते दिनांक

३१/१२/२०१० या कालावधीत ५ टक्के दराने मूल्यवर्धित कर गोळा करुन शासनास भरला. या स्क्रिप्स् (scrips) खरेदी केलेल्या व्यापा-यांनी भरलेल्या कराच्या वजावटीचा दावा केला आहे.

दिनांक १/१/२०११ पूर्वीच्या कालावधीमध्ये अनुसूची ग - नोंद क्र. ३९ च्या नोंद क्र.३ अंतर्गत सर्व प्रकारच्या स्क्रिप्स् (scrips) येत नसल्यामुळे गोळा करुन भरलेला कर हा समपहरणास (forfeiture) पात्र होतो व खरेदी करणा-या व्यापा-यास त्याची वजावट मिळत नाही. याकरिता दिनांक १/१/२०११ पूर्वी अशा करमुक्त स्क्रिप्स् (scrips) वरील गोळा करुन भरलेला कर व त्यावरील वजावट नियमित करण्यात यावी अशी निवेदने व्यापाऱ्यांकडून प्राप्त झाली.

**शासन निर्णय -**

वरील निवेदनाचा सर्वंकष विचार करुन शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे-

ज्या व्यापाऱ्यांनी मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२ च्या अनुसूची ग - नोंद क्र.३९, उप नोंद ३ मध्ये समाविष्ट नसलेल्या विशेष आयात परवान्यासह आयात परवाना, शुल्क मुक्त आगाऊ परवाना आणि विदेश व्यापार धोरणान्वये विदेश व्यापार (विकास आणि विनियमन) अधिनियम, १९९२ खाली निर्गमित केली जाणारी इतर कोणतीही स्क्रिप्स् यांच्या विक्रीवर दिनांक १/४/२००५ ते दिनांक ३१/३/२०१० या कालावधीत ४ टक्के दराने व दिनांक १/४/२०१० ते दिनांक ३१/१२/२०१० या कालावधीत ५ टक्के दराने मूल्यवर्धित कर गोळा करुन शासनाकडे भरला असेल अशा व्यापाऱ्यांचा कर समपहरित (forfeit) होणार नाही, तथापि या स्क्रिप्स्च्या (scrips) विक्रीवर गोळा करुन भरलेल्या कराचा परतावा विक्रेता व्यापा-यास मिळणार नाही. तसेच खरेदीदार व्यापाऱ्यांनी अशा स्क्रिप्स् (scrips) च्या वजावटीसाठी दावा केल्यास विक्रेत्याने कर भरणा केल्याच्या अटीच्या अधीन राहून दावा मान्य करण्यात येईल.

**सवलतीच्या अटी -**

१) या स्क्रिप्स् (scrips) ची विक्री व खरेदी करणारा व्यापारी हा महाराष्ट्र मूल्यवर्धित अधिनियम, २००२ खाली नोंदणीकृत असावा.

२) व्यापाऱ्यांनी करमुक्त स्क्रिप्स् (scrips) वर दिनांक १/४/२००५ ते दिनांक ३१/३/२०१० या कालावधीत ४ टक्के दराने व दिनांक १/४/२०१० ते दिनांक ३१/१२/२०१० या कालावधीत ५ टक्के दराने गोळा करुन तो शासनाकडे भरलेला असावा.

**प्रशासकीय सवलत मंजूर करणारी यंत्रणा -**

या शासन निर्णयाखाली प्रशासकीय सहाय्य मंजूर करण्याचे अधिकार, विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना देण्यात येत असून आवश्यकतेनुसार सदर अधिकार

आयुक्तांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील अपर विक्रीकर आयुक्त, सह विक्रीकर आयुक्त, विक्रीकर उपायुक्त, सहायक विक्रीकर आयुक्त अथवा त्या दर्जाखालील इतर संबंधित अधिका-यांना प्रदान करण्याची परवानगी विक्रीकर आयुक्तांना देण्यात येत आहे. तसेच प्रशासकीय सवलती संबंधी अडचणी असल्यास विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचा निर्णय अंतिम असेल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१११०२११२३७१९००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

भांगडीया
२७।१०।११

( ओ. चै. भांगडीया )
उप सचिव, वित्त विभाग

प्रति,

विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, विक्रीकर भवन, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत,

राज्यपालांचे सचिव,
मुख्य मंत्र्यांचे व उपमुख्यमंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सहायक,
सर्व विधान मंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य,
सर्व संसद सदस्य महाराष्ट्र राज्य,
बहुजन समाज पार्टी १, इन्सा हटमेंट,आझाद मैदान, मुंबई - १,
भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ.बॅरेक नं.१, योगक्षेमसमोर, वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉइंट, मुंबई,
भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभवन, एस.व्ही.पटेल रोड, मुंबई,
भारतीय कम्युनिस्ट पार्टी, (मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई - १३,
इंडियन नॅशनल काँग्रेस, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई - २५,
नॅशनल काँग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरीमन पॉईंट, मुंबई - २१,
महालेखापाल (लेखा परीक्षा)-१ महाराष्ट्र, मुंबई,
महालेखापाल (लेखा परीक्षा)-२ महाराष्ट्र, नागपूर,
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१ महाराष्ट्र, मुंबई,
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२ महाराष्ट्र, नागपूर,
महालेखापाल (वाणिज्यीक लेखापरीक्षा),महाराष्ट्र, मुंबई,
सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई (पत्रान्वये),
प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई (पत्रान्वये),
प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई (पत्रान्वये),
जनसंपर्क अधिकारी, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई,

-------